माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माआधि/अपिल/०४७/२०१७-१८
दि.०६/०४/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.संतोष कुमार तिवारी, ..............अपिलार्थी
सी ०४, न्यु मिरा पॅराडाईज,
गिता नगर, जुन्या पेट्रोल पंपच्या मागे,
मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
विभागप्रमुख (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.संतोष कुमार तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (आस्थापना) यांचेकडे दि.१६/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

क) मिरा भायंदर नगरपालिका बनने से लेकर अब तक सैनिक इंटेलिजन्स एंड सिक्युरिटी सर्विसेस को सन २००४ से लेकर अब तक कितने बार सुरक्षा रक्षक मनपा के विभीन्न स्थानो पर रखने के ठेका दिया गया सभी कि वर्षानुसार जानकारी कि प्रत प्रदान कराये।

ख) सैनिक इंटेलिजन्स एंड सिक्युरिटी सर्विसेस द्वारा प्रत्येक निविदा चयन होने के बाद कौन कौन से सुरक्षा रक्षक किन किन मनपा के स्थानो पर तैनात किये गये थे उनकी सुची वर्षनुसार हमे प्रदान करे।

ग) प्रत्येक बारके दिये गये ठेके मे सैनिक सिक्युरिटी निविदा सभी निविदाओं कि प्रत तथा मनपा द्वारा जारी अटीशर्ती की प्रत प्रदान करे।

घ) मनपा द्वारा प्रत्येक बार को सुरक्षा रक्षक एजेन्सी को नियुक्त करने से पहले महासभा व स्थायी समिती से पास किया गया प्रस्ताव कि प्रत प्रदान करे।

ङ) सैनिक इंटेलिजन्स एंड सिक्युरिटी सर्विसेस को प्रत्येक टर्म के बिच बिच मे किन किन जगहो पर अतिरिक्त सुरक्षा रक्षक रखने कि कार्यादेश जारी किया था उन सभी आदेशो कि वर्षानुसार प्रत प्रदान करे।

च) २००४ से २०१८ तक का सैनिक इंटेलिजन्स एंड सिक्युरिटी सर्विसेस का प्रत्येक वर्ष का जनवरी व फरवरी का बिल प्रदान कराये।

छ) सैनिक इंटेलिजन्स एंड सिक्युरिटी के मालक हैगरिबा गुरु कि कंपनी गुरुजी कंस्ट्रक्शन कंपनी को २००४ से लेकर अबतक कौन कौन से कार्यों के ठेके मनपा द्वारा दिया गया है सभी का विवरण व कार्यादेश कि प्रत प्रदान करे।

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१६/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२५४/२०१८ दि.१९/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१६/०३/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदारास दि.१७/०२/२०१८ रोजी स्पीड पोष्टाद्वारे पत्र देऊन आपण मागविलेल्या माहितीचा कालावधी हा प्रदिर्घ असल्याने आपणास माहिती उपलब्ध करुन देणेस वेळ लागणार आहे असे कळविण्यात आले आहे.

मे.सैनिक इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांना सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत पी.एफ. तसेच इतर माहिती मिळणेबाबत प्रशासनाने पत्र देऊन कळविले असता मे.सैनिक इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. या एजन्सीने याबाबतची माहिती अन्य त्रयस्थ व्यक्तिंना देऊ नये असे कळविले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदाराने उपस्थित केलेल्या क ते छ मुद्दांची अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांत अपिलार्थी अर्जदारास विनाशुल्क पुरविण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.संतोष कुमार तिवारी,
सी ०४, न्यु मिरा पॅराडाइज,
गिता नगर, जुन्या पेट्रोल पंपच्या मागे,

मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

for
[signature] 16/4/18

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

<Dial 1800 266 6868>

भारतीय डाक
India Post

EM0409972162IN IVR:6977040997216?
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:6,17/04/2018,10:59
To:SANTOSH KUMAR TIWARI,MIRA RD
PIN:401107, Mira Road S.O
From:MIRA BHAYNADER,BHYW
Wt:10gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>